MHTH070023422026

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १८.०६.२०२६ |
| नोंदणी दिनांक | : | २०.०६.२०२६ |
| निकाल दिनांक | : | ०६.०७.२०२६ |
| कालावधी | : | ००व ००म १९ दि |

**<u>दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कल्याण यांचे न्यायालयात</u>**
(पीठासन अधिकारी श्रीमती के.पी.आर.एस. राठौर यांचे समोर)

विवाह अर्ज क्र.९८४/२०२६
निशाणी क्र.१२.

**कविता विजयकुमार सरोज**
**उर्फ कविता जोखनलाल भारतीय,**
वय : ३४ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा. द्वारा जोखनलाल भारतीय,
रुम नं. २८३, जनता कॉलनी, विर नरीमन रोड,
चंदू गारमेंट जवळ, वरळी व्हीलेज, मुंबई. ...अर्जदार क्र.१

आणि

**विजयकुमार भाईलाल सरोज,**
वय : ३८ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
रा. फ्लॅट नं. ५१, ५वा माळा, बिल्डींग–डब्ल्यू,
अमांत्रा हौसींग कॉम्प्लेक्स रांजनोली,
भिवंडी, जि. ठाणे. ...अर्जदार क्र.२

हिंदू विवाह कायदा, १९५५ कलम १३ब प्रमाणे एकमेकांच्या संमतीने घटस्फोट मिळणेसाठी.

---

उपस्थिती : अर्जदार क्र.१ तर्फे विधिज्ञ श्रीमती रीना सावंत
अर्जदार क्र.२ तर्फे विधिज्ञ श्रीमती एस. आर. मोमीन

---

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०९ जुलै २०२६ रोजी पारीत)

सदरचा अर्ज अर्जदार यांनी हिंदू विवाह कायदा, १९५५ कलम १३–ब, प्रमाणे परस्पर संमतीने विवाह विच्छेदनासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे अर्जातील म्हणणे थोडक्यात पुढीलप्रमाणे :–

अर्जदार क्र.१ व २ हे पती–पत्नी असून त्यांचा विवाह दिनांक ०१/१२/२०२१ रोजी कल्याण, जि. ठाणे येथे हिंदू धर्म रितीरिवाजाप्रमाणे झालेला आहे. सदर विवाह संबंधातून त्यांना एक अपत्य आहे. लग्नानंतर काही कालावधीनंतर अर्जदार क्र.१ व २ यांच्यात मतभेद व वाद निर्माण झाले. उभयतांनी सदरील मतभेद सोडविण्यासाठी चर्चा करून बरेच प्रयत्न केले. परंतू यश प्राप्त झाले नाही. दोन्ही अर्जदार दि.०१.०९.२०२३ पासून स्वतंत्रपणे राहत आहेत. दोन्हीही अर्जदार परस्पर मतभिन्नतेमुळे एकमेकांसोबत समायोजन करु शकले नाही. त्यामुळे त्यांचेतील विवाह संबंध पुन्हा पुर्नस्थापीत होऊ शकत नाहीत. अशा अप्राप्य पद्धतीने विच्छेदीत झालेले आहे. दोन्ही अर्जदारांना यापुढे पती–पत्नी म्हणून एकत्रात येउन राहणे शक्य नाही. दोन्ही अर्जदारांमध्ये समझोता घडवून आणण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले आहेत व यापुढे देखील तसे यश येण्याची शक्यता नाही. त्यामुळे त्यांनी कायदेशिर पद्धतीने, परस्पर संमतीने विवाह विच्छेदन करुन घेण्याचे ठरविले आहे व त्यानुसार सदरचा अर्ज दाखल केला आहे. दोन्ही अर्जदारांमधील कन्सेंट टर्मस नि.१ मध्ये नमूद आहेत.

३. माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे निष्कर्ष पुढील प्रमाणे काढले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ व २ हे परस्पर संमतीने विवाह विच्छेदन मिळणेस पात्र आहेत काय ? | ...होय. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | ...अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

**<u>कारणमीमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ बाबत :–</u>**

४. अर्जदारांनी सदरचा अर्ज दिनांक १८.०६.२०२६ रोजी दाखल केला आहे. दोन्ही अर्जदार हजर झाल्यावर त्यांच्या पहिल्या प्रस्तावाचे प्रतिज्ञापत्र स्वीकारण्यात आले. तद्नंतर अर्जदारांनी प्रतिक्षा कालावधी माफ होवून मिळणेसाठी अर्ज केला. सदरील अर्ज मंजूर करण्यात आला. मध्यस्थी अहवाल व इतर बाबी विचारात घेऊन सुनावणी घेण्यात आली. दुस–या प्रस्तावाच्या कामी दोन्ही अर्जदारांनी त्यांचे पुरावा प्रतिज्ञापत्र नि.९ व नि.१० नुसार दाखल केले असून त्याद्वारे त्यांनी त्यांचे अर्जातील मजकूराचा पुर्नउल्लेख केलेला आहे. अर्जदारांच्या पुरावा प्रतिज्ञापत्रातील मजकूर पाहिला असता असे स्पष्ट होते की, दोन्ही अर्जदार दि. ०१.०९.२०२३ पासून एकत्र राहत नसून स्वतंत्रपणे राहात आहेत. अर्जदारांनी दाखल केलेले कागदपत्र पाहता, लग्न पत्रीका, लग्नाचा फोटो व अर्जदारांचे ओळखपत्र, इ. दाखल केल्या आहेत.

५. अर्जदार दि. ०१.०९.२०२३ पासून वेगळे राहत असून त्यांच्यातील स्वतंत्र राहण्याचा कालावधी दीड वर्षापेक्षा जास्त आहे. अर्जदारांनी मागितलेला परस्पर समंतीने विवाह विच्छेदन करुन देण्यात कोणतीही कायदेशिर बाधा नाही. मी दोन्ही अर्जदारांची तोंडी चौकशी करुन विवाह विच्छेदनासाठी दोघांची इच्छा असल्याची खात्री करुन घेतली. वर उल्लेख केल्याप्रमाणे उभयपक्ष त्यांच्या विवाह विच्छेदनाच्या मूळ भूमिकेवर ठाम असून त्यांनी त्यांचे मत बदललेले नाही.

६. अर्जदारांचे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही अर्जदारांचे म्हणणे ऐकून त्यांची तोंडी चौकशी केली. त्यावरुन असे दिसून येते की, दोन्ही अर्जदारांचा विवाह झालेला असून त्यांचे अर्जातील म्हणणे खरे आहे. दोन्ही पक्षकारांनी विवाह विच्छेदन करुन घेणेचे ठरविले आहे. अर्जदारांकडून असे देखील सांगण्यात आले

की, त्यांच्यातील मतभिन्नता इतक्या टोकापर्यंत पोहोचली आहे की, ते यापुढे एकत्र राहू शकत नाहीत. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी काढीत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत** :–

७. मुद्दा क्र.१ च्या होकारार्थी निष्कर्षाच्या अनुषंगाने अर्जदारांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र.२ च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आदेश

(१) अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) अर्जदार क्र.१ **कविता विजयकुमार सरोज उर्फ कविता जोखनलाल भारतीय** व अर्जदार क्र.२ **विजयकुमार भाईलाल सरोज** यांचेतील दिनांक ०१/१२/२०२१ रोजी झालेल्या विवाहाचे विच्छेदन झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

(३) येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

KANTA PR SINGH RATHORE

Digitally signed by KANTA PR SINGH RATHORE
Date: 2026.07.09 16:31:38 +0530

दिनांक : ०९/०७/२०२६.

(श्रीमती के.पी.आर.एस. राठौर)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
कल्याण.